**कृपया प्रसिद्धीसाठी** **14 मार्च 2012**

## सामान्य प्रवाशांची लूटमार आणि
## दिशाभूल करणारा रेल्वे अर्थसंकल्पः राम नाईक

**मुंबई,बुधवारः** ''सामान्य रेल्वे प्रवाशांची लूटमार आणि दिशाभूल करणारा हा रेल्वे अर्थसंकल्प आहे'', अशी टीका माजी रेल्वे राज्य मंत्री (स्वतंत्र प्रभार) श्री. राम नाईक यांनी केली आहे.

रेल्वे मंत्री श्री. दिनेश त्रिवेदी यांनी भाडेवाढ करुन प्रवाशांवर टाकलेला बोजा मोठा आहे. प्रतिकिलोमीटर 2 पैसे हे ऐकायला कमी वाटतात, त्याचा खरा अर्थ विरार - चर्चगेट प्रवासाला दररोज रु. 2.40 जास्त लागणार म्हणजेच मासिक पासासाठी रु. 48 लागणार आहेत असा आहे हे लक्षात घेतले पाहिजे, असे सांगून, ''एमयुटीपी - I पूर्ण झाला आहे असे प्रतिपादन जर रेल्वे मंत्री करतात, तर मग या प्रकल्पातील चर्चगेट - डहाणू थेट रेल्वे सुरु का करीत नाही?'', असा प्रश्न श्री. राम नाईक यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना विचारला.

''बहुतेक सर्व योजनांवर रेल्वे मंत्र्यांनी विचार करण्याचा संकल्प व्यक्त केला आहे. ही क्रियेविना वाचाळता आहे'' असे सांगून श्री. राम नाईक म्हणाले,''डीसी चे एसी झाल्यामुळे चर्चगेट - विरार गाड्यांचा वेग 80 किलामीटर वरुन 100 किमी झाला आहे. त्यामुळे नवे वेळापत्रक केल्यास 25 टक्के गाड्या वाढू शकतात. त्या वाढवाव्यात अशी मागणी आम्ही रेल्वे मंत्र्यांकडे केली होती. ही अपेक्षा पूर्ण झाली नसली तरी निदान काही फे-या तरी वाढल्या एवढे समाधान फक्त मुंबईकर उपनगरी प्रवाशांच्या वाट्याला आले आहे.''

संपूर्ण देशाचा विचार करता तर या रेल्वे अर्थ संकल्पात दरवाढीच्या ओझ्याखेरीज सामान्य माणसाच्या हाती काहीही लागलेले नाही अशी टीका श्री. राम नाईक यांनी केली.

**(कार्यालय सचिव)**